# शासन योजनांचा निधी अन् व्याज इतर कामांसाठी वळविण्यास मनाई

■ नगरविकास विभागाचा महापालिका व नगपालिकांना दणका

**पिंपरी–चिंचवड : प्रतिनिधी**

शासनाकडून एखाद्या योजनेसाठी मिळालेला निधी अथवा त्याचे व्याज इतर योजनांसाठी खर्च करणाऱ्या महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांसह अधिकाऱ्यांना राज्य सरकारने मोठा दणका दिला आहे. यापुढे अन्य प्रयोजनांसाठी निधी वळता केल्यास ती अनियमितता मानून संबंधितांवर थेट कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे महासभांच्या माध्यमातून योजनांचा निधी वळवण्यावर आता निर्बंध येणार आहेत. राज्याच्या नगरविकास विभागामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान, नगरपरिषदांसाठी वैशिष्ट्यपूर्ण योजना, महापालिका आणि नगरपालिकांसाठी हद्दवाढ योजना अशा विविध प्रकारच्या योजना राबवण्यात येतात. त्यासाठी शासनाकडून महापालिका नगरपालिकांना अनुदान मंजूर केले जाते. हे अनुदान महापालिका स्वतंत्र बँक खाते उघडून त्यात जमा करतात, अशा खात्यामधून रकमा महापालिका जनरल



खात्याकडे तात्पुरत्या स्वरूपात अथवा कायमस्वरूपी वळत्या करून घेतात. त्यामुळे आहे त्या योजनेसाठी दिलेल्या निधीचा त्याच कामासाठी वापर होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. अशा परिस्थितीत नगरविकास विभागाने महापालिका व नगरपालिकांना थेट निर्देश देऊन सुरू असलेला मनमानी कारभार थांबवण्याच्या सूचना केल्या आहेत. अनेकदा बहुमताच्या जोरावर महापालिका व नगरपालिकेच्या सभागृहात वाट्टेल ते निर्णय घेतले जातात. आपलीच सत्ता आहे। काही फरक पडणार नाही, या अविर्भावात बऱ्याचदा मनमानी कारभार चालवला जातो. अशा प्रकारच्या निर्णयातून महापालिकेतील सत्ताधारी अनेकदा गोत्यात आले आहेत. त्यामुळे नगरविकास विभागाने काढलेला हा आदेश एकप्रकारे इशाराच मानला जात आहे. त्याकडे दुर्लक्ष करून आपलेच खरे करण्याचा प्रयत्न झाल्यास नाहक पोलिस न्यायालयाच्या पायऱ्या झिजवण्याची वेळ येऊ शकते. नगरविकास विभागाकडून मंजूर निधी किंवा निधीच्या खात्यावर जमा झालेले व्याज कोणत्याही परिस्थितीत अन्य योजनेकडे किंवा अन्य प्रयोजनाकडे वळते करण्यात येऊ नये; अन्यथा निधी वळवणे ही गंभीर स्वरूपाची आर्थिक अनियमितता मानली जाणार आहे. त्यासाठी संबंधित महापालिका अधिकारी कारवाईस पात्र ठरवले जाणार आहेत. शासनाने कोणत्याही योजनेसाठी मंजूर केलेला निधी फक्त त्याच योजनेसाठी वापरण्यात यावे. यापूर्वी वळवलेल्या रकमा तातडीने योजनेच्या खात्यावर वर्ग करण्याचे आदेश नगरविकास विभागाने दिले आहेत.



बोपखेल ग्रामस्थांसाठी मुळा नदीवर उभारण्यात आलेला तात्पुरता तरंगता पूल.

# बोपखेल ग्रामस्थांसाठी मुळा नदीवर पाँटून पूल उभारण्याचा निर्णय

**पिंपरी–चिंचवड : प्रतिनिधी**

महापालिका आयुक्त दिनेश वाघमारे यांची माहिती पिंपरी, दि. ३० (पीसीबी) – बोपखेल ग्रामस्थांसाठी मुळा नदीवर उभारण्यात आलेला तात्पुरता तरंगता पूल पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ७ जून पूर्वी काढणार असल्याच्या मुद्द्यावर लष्कर ठाम आहे. त्यामुळे बोपखेलवासीयांसाठी पर्यायी रस्ता देण्यासंदर्भात लष्करासोबत चर्चा झाली. त्यानुसार सध्या असलेल्या पुलाच्या शेजारीच गंगा नदीवर कुंभमेळ्याच्यावेळी उभारण्यात येणारे पाँटून पूल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी एक महिन्याचा कालावधी लागू शकतो. त्यामुळे हो पूल तयार होईपर्यंत सध्या असलेला पूल काढण्यात येऊ नये, अशी मागणी संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांच्याकडे मंगळवारी होणाऱ्या बैठकीत केली जाणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली. दापोडी येथील लष्कराच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातून जाणारा रस्ता वापरासाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी आंदोलन केले होते. हे आंदोलन चिघळल्यामुळे ग्रामस्थांना अटक करण्यात आली होती. त्यामुळे बोपखेलगावच्या रस्त्याचा प्रश्न ऐरणीवर आला. लष्कर आणि स्थानिक प्रशासनामध्ये झालेल्या चर्चेत मुळा नदीवर तात्पुरता तरंगता पूल उभारण्याचा निर्णय झाला. त्यानुसार लष्कराने मुळा नदीवर हा पूल उभारून बोपखेल ग्रामस्थांना रस्ता उपलब्ध करून दिला आहे. परंतु, पावसाळ्यात हा पूल धोकादायक ठरणार असल्यामुळे लष्कराने ७ जूनपूर्वी तो काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकारी सौरभ राव यांनी आज (सोमवार) महापालिकेत बैठक घेतली. या बैठकीला महापौर शकुंतला धराडे, खासदार अमर साबळे, आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, आयुक्त दिनेश वाघमारे, स्थायी समिती सभापती डब्बू आसवानी, नगरसेविका चंद्रकांता सोनकांबळे, नगरसेवक संजय काटे, शिक्षण मंडळाचे माजी सभापती चेतन घुले, महापालिका, लष्कर, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड आणि पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत झालेल्या चर्चेबाबत आयुक्त वाघमारे यांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. आयुक्त वाघमारे म्हणाले, मुळा नदीवरील सध्याचा तरंगता पूल काढण्यावर लष्कर ठाम आहे. हा पूल पावसाळ्यात धोकादायक ठरून जिवीतहानी होण्याची भिती लष्कराने व्यक्त केली आहे. तसे झाल्यास लष्कराच्या अभियांत्रिकी क्षेत्रातील नावाजलेले असलेल्या दापोडीतील सर्वोच्च संस्थेच्या प्रतिमेला धक्का बसेल. त्यामुळे हा पूल ७ जूनपूर्वी कोणत्याही परिस्थितीत हटविण्याची भूमिका लष्कराने घेतली आहे. त्याबाबत फेरविचार करण्याची विनंती करूनही लष्कर आपल्या मतावर ठाम आहे. त्यामुळे या बैठकीत पर्यायी रस्त्याबाबतही विचारविनिमय झाला. काही लोकप्रतिनिधींनी लष्कर अभियांत्रिकी महाविद्यालयातून जाणारा पूर्वीचा रस्ता खुला करण्याची मागणी केली. परंतु, लष्कराच्या अधिकाऱ्यांनी आता तो रस्ता आम्ही देखील वापरत नसल्याचे सांगितले. उच्च न्यायालयाचेच आदेश असल्यामुळे हा रस्ता वाहतुकीसाठी खुला करता येत नसल्याचे लष्कराने स्पष्ट केले. त्यामुळे कुंभमेळ्याच्या वेळी गंगा नदीवर उभारण्यात येणाऱ्या पाँटून पुलाचा पर्याय समोर आला. संपूर्ण मेटलचे असणारे अशा प्रकारच्या पुलावरून अनेकदा रणगाडेही चालविले जातात. त्यामुळे मजबूत असलेले अशा प्रकारचे पूल चार ते पाच वर्षे टिकते. त्यामुळे मुळा नदीवर बोपखेल ग्रामस्थांसाठी पाँटून पूल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र त्यासाठी एक महिन्याचा कालावधी लागतो. त्यामुळे पाँटून पूल उभारेपर्यंत सध्याचा पूल कायम ठेवण्याबाबत लष्कराकडे विनंती केली जाणार आहे. संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांनी मंगळवारी (दि. ३१) पुण्यात बैठक बोलाविली आहे. त्यामध्ये मुळा नदीवरील सध्याचा पूल कायम ठेवण्याची मागणी त्यांच्याकडे केली जाणार आहे. याशिवाय लष्कराशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवरही या बैठकीत चर्चा होणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

## संपादकीय...

# नाथा पुरे आता...

महसूलमंत्री एकनाथराव खडसे यांच्यावरील झालेल्या कथित आरोपाने राज्यातील वातावरण तापले असून सामाजिक कार्यकर्ते व विरोधी पक्षांनी भाजप सरकारला कोंडीत पकडण्यासाठी आक्रमक भूमिका घेतल्याने पक्षाची प्रतिमा मलीन होत असल्याचे दिसून येत आहे. भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर भाजपा सरकार स्थापन झाले असल्याने त्याच प्रकारचा आरोप ज्येष्ठ नेत्यावर होत असल्याने राज्यातील जनता संभ्रमात पडल्याचे दिसते. विरोधी पक्षात असताना ना. खडसे यांनी भ्रष्टाचारांचे आरोप असलेल्या मंत्र्यांवर कारवाई करण्यास भाग पाडून त्यांना मंत्रीपदावरून पायउतार केले होते. हे जनता विसरलेली नाही. परंतु दुर्दैवाने तीच गत आज खडसेंची होती की, काय? अशी अवस्था आज खडसेंची झाली असल्याने सर्व राजकारणी एकाच माळेचे मनी असल्याचे सर्व सामान्यांची समजूत दृढ झाल्याचे निदर्शनास येते. यापूर्वी भाजपाच्या मंत्र्यांवर अनेक आरोप झाले. पंकजा मुंडे, विनोद तावडे, केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांच्या पाठीशी पक्ष खंबीरपणे उभा राहिला. परंतु खडसेंच्या बाबतीत, असे घडायला तयार नाही. त्यामुळे खडसे एकटेच आरोपाला प्रत्युत्तर देताना दिसतात. एकही आरोप सिद्ध झाल्यास स्वत: राजीनामा देईन, असे म्हणत ते या आरोपांशी सामना करतानाचे दृश्य राज्यातील जनता पाहताना दिसते. भाजपाचा मित्र पक्ष असलेल्या शिवसेनेने समंजसपणाची भूमिका घेत खडसेंनी स्वत:हून नैतिकतेच्या आधारावर राजीनामा देवून आरोपाविरुद्ध लढले पाहिजे, असे म्हटल्याचे समजते. लढाऊ आणि आक्रमक असलेल्या या नेत्यांच्यामागे जळगावातील जनता भक्कमपणे पाठशी असल्याचे दिसते. नाथाभाऊ असले कृत्य कधीच करणार नाही, असा त्यांना ठाम विश्वास आहे. जळगावात प्रकाशित होणाऱ्या नामांकित वृत्तपत्रांच्या संपादकांशी खडसेंचे मैत्रीपूर्ण संबंध असल्याने ते त्यांच्या पाठीशी उभे रहात, खडसेंना विनाकारण या प्रकरणात गोवले गेल्याचे मत मांडताना दिसतात. कथित आरोपापैकी खडसे यांनी आपल्या मंत्रीपदाचा गैरवापर करून भोसरी येथील ४ एकर जमीन नाममात्र दरामध्ये कुटूंबियांच्या नावे खरेदी केली. हा गंभीर आरोप त्यांच्यावर झाल्याने ते पुरते हैराण झाल्याचे दिसून येतात. शिवसेनेच्या मंत्र्यांनी ही जागा एमआयडीसीची असून ती विकता येत नसल्याचे स्पष्ट सांगितल्याने या प्रकरणाने गंभीर वळण घेतल्याचे दिसते. इतर आरोपांमध्ये त्यांच्यावर कुरघोडी केल्याचे प्रथमदर्शनी दिसत असले तरी आरोपकर्ते आपल्या भूमिकेवर ठाम राहून पुरावे सादर करण्याची भाषा करताना दिसतात. सारासार विचार करता नाथाभाऊंनी शिवसेनेच्या मांडलेल्या मताप्रमाणे नैतिकतेच्या आधारावर राजीनामा देवून निर्भयपणे चौकशीला सामोरे गेल्यास त्यांची पत कमी होण्या ऐवजी उंचावेल, हे सांगायला कोण्या कुडमुड्या जोतीषाची गरज नाही.

# दिघीत भाजपच्या जनसंपर्क कार्यालयाचे आमदार जगतापांच्या हस्ते उद्घाटन



**भोसरी :** दिघी येथे भारतीय जनता पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन शहराध्यक्ष तथा आमदार लक्ष्मण जगताप यांच्या हस्ते नुकतेच झाले. यावेळी भाजपचे पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख एकनाथ पवार, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष शैला मोळक, शिक्षण मंडळाचे माजी सभापती चेतन घुले, दिघी विभागाचे अध्यक्ष शशीकांत वाळके, विभागाच्या महिलाध्यक्षा कांचन लांघी, युवाध्यक्ष अमित महाडीक आदी उपस्थित होते.